पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.२

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक ३/५/२०१३ वेळ दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दि. ३/५/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सोनाली जम, | अध्यक्षा, |
| २. | मा.प्रभाकर वाघेरे | सदस्य |
| ३. | मा.विनय गायकवाड | सदस्य |
| ४. | मा.राजेंद्ग जगताप | सदस्य |
| ५. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |
| ६. | मा.सुषमा तनपुरे | सदस्या |

याशिवाय मा.बी.एम.सुतार, प्रभारी प्रशासन अधिकारी , मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.एस.एस.चव्हाण,कार्यकारी अभियंता विदयुत, मा.शरद जाधव, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.निकम,कार्यकारी अभियंता, जलनिसारण विभाग, मा.रामनाथ टकले उपअभियंता, स्थापत्य, मा.रविंद्ग पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.शेख, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.एम.बी.सोनवणे, उपअभियंता, विदयुत, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता, विदयुत मा.राजेंद्ग जावळे, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.अनिल राऊत, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.रत्नपारखी, उपअभियंता, स्थापत्य मा.व्ही.एउम.इंगुळकर लेखाधिकारी मा.व्ही.एल.चव्हाण सहा आरोग्याधिकारी, मा.बेडाळे, सहा.आरोग्याधिकारी .

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.नगरसदस्य यांचे मागणीप्रमाणे पुढीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्र.१** वॉर्ड क्रमांक ४५ पिंपरी वाघेरे येथील न्हावी आळी येथील संडास ब्लॉक रस्तारुंदीकरणामध्ये येत असल्याने सदर संडास ब्लॉक पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.प्रभाकर वाघेरे याचा प्रस्ताव.

**विषय क्र.२** वॉर्ड क्रमांक ५३ वाकड येथील मुतारी हटविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव

**विषय क्र.३** वाकड येथील ४५ मी. बी आरटीएस रस्त्याने बाधित होणारी पाण्याची सटाकी पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.४.** सन २०१३-२०१४ चे अंदाजपत्रकातील नविन विकास कामांना मंजूरी देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

यानंतर मा.शैलजा शितोळे यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली.

आज दिनांक ३/५/२०१३ रोजीची सभा गणसंख्या अभावी तहकुब करणेत येवून सदरची तहकुब सभा दिनांक १०/५/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करणेत यावी.

सदर सुचनेस मा.सुषमा तनपुरे यांनी अनुमोदन दिले.

त्याप्रमाणे मा.अध्यक्ष यांनी आज दिनांक ३/५/२०१३ रोजीची प्रभाग समितीची सभा दिनांक १०/५/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकुब करणंत येत असल्याचे प्रकट केले.

सही/-
सोनाली पोपट जम
अध्यक्षा
ड प्रभाग समिती,पिं.चिं.म.न.पा.,

सही/-
प्रशासन अधिकारी सभा शाखा
प्रभाग समिती ,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - १७

जा.क्र.ड/सभा/कावि/१०/२०१३
दिनांक ३/९/२०१३

प्रति,
मा.श्री./श्रीमती -----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.२

(दिनांक ३/५/२०१३ रोजीची तहकुब सभा)

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक १०/५/२०१३ वेळ दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक तहकुब सभा शुक्रवार दि. १०/५/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सोनाली जम, | अध्यक्षा, |
| २. | मा.कैलासभाऊ थोपटे | सदस्य |
| ३. | मा.विनय गायकवाड | सदस्य |
| ४. | मा.बापु काटे | सदस्य |
| ५. | मा.राजेंद्ग जगताप | सदस्य |
| ६. | मा.प्रशांत शितोळे | सदस्य |
| ७. | मा.सुनिता वाघेरे | सदस्या |
| ८. | मा.निता पाडाळे | सदस्या |
| ९. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| १०. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| ११. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| १२. | मा.वैशाली जवळकर | सदस्या |
| १३. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |

याशिवाय मा.पी.एच.झुरे प्रभाग अधिकारी, मा.बी.एम.सुतार, प्रभारी प्रशासन अधिकारी, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.एस.एस.चव्हाण, कार्यकारी अभियंता विदयुत, मा.शरद जाधव, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.निकम, कार्यकारी अभियंता, जलनिसारण विभाग, मा.रामनाथ टकले उपअभियंता, स्थापत्य, मा.रविंद्ग पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.शेख, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.एम.बी.सोनवणे, उपअभियंता, विदयुत, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता, विदयुत मा.राजेंद्ग जावळे, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.अनिल राऊत, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.रत्नपारखी, उपअभियंता, स्थापत्य मा.व्ही.एम.इंगुळकर लेखाधिकारी मा.व्ही.एल.चव्हाण सहा आरोग्याधिकारी, मा.बेडाळे,

सहा.आरोग्याधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. यानंतर मा.अध्यक्षा यांनी मागील कार्यपत्रिका क्र.११, दिनांक ८/३/२०१३, दिनांक १५/३/२०१३ तसेच कार्यपत्रिका क्रमांक १ दिनांक ५/४/२०१३ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले.

ठराव क्रमांक ३ विषय क्र.१
दिनांक १०/५/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा. आरती चोंधे े अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे
संदर्भ :- मा. प्रभाकर वाघेरे यांचा दिनांक ३/५/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

वॉ.क्र. ४५ पिंपरी वाघेरे येथील न्हावी आळी येथील मनपाचा संडास ब्लॉक रस्तारुंदीकरणामध्ये येत असल्याने सदरचा संडास ब्लॉक पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

ठराव क्रमांक ४ विषय क्र.२
दिनांक १०/५/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा. विनय गायकवाड अनुमोदक - मा.कैलास थोपटे
संदर्भ :- मा. विनय गायकवाड यांचा दिनांक ३/५/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५३ वाकड येथील कावेरीनगर रोडवरील मुतारी ही नागरीवस्ती येथेच आहे व या मुतारी मुळे खुप नागरीकांना त्रास होतो. तरी सदर मुतारी हटविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

ठराव क्रमांक ५ विषय क्र.३
दिनांक १०/५/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.विनय गायकवाड अनुमोदक - मा.कैलास थोपटे
संदर्भ :- मा. विनय गायकवाड यांचा दिनांक ३/५/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

कस्पटेवस्ती ते वाकड या ४५.०० मी.बीआरटीएस रस्त्याने वाकड येथील पाण्याची टाकी बाधीत होत आहे. त्यामुळे ही टाकी पाडणोठी मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे तसेच सदर टाकीसाठी भुमकरवस्ती येथे पर्यायी टाक्या उपलब्ध असल्याने त्या टाक्यांवरून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे वाकड येथील टाकीवरील पाणीपुरवठा बंद करणेत आलेला आहे. त्यामुळे वाकड येथील कस्पटेवस्ती

ते वाकड या ४५.०० मी.डीपी रस्त्याने बाधित होणारी पाण्याची टाकी पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

ठराव क्रमांक ६ विषय क्र.४
दिनांक १०/५/२०१३ विभाग - स्थापत्य
सुचक - मा. सुषमा तनपुरे अनुमोदक - मा.आरती चोंधे

संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे यांचा दिनांक ३/५/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

सन २०१३-२०१४ चे मनपाचे अंदाजपत्रक मनपा सभेमध्ये मंजूर झालेले आहे. त्यातील ड प्रभागांतर्गत स्थापत्य, पाणीपुरवठा व विदयुत विषयक नवीन विकास कामे सुचविणेत आलेली आहेत. कामाचा कालावधी विचारात घेता स्थापत्य, पाणीपुरवठा व विदयुत विषयक कामे तातडीने होण्यासाठी सर्व नवीन कामांना स्वतंत्रपणे प्रशासकीय मान्यता देण्यात यावी व तातडीने निविदा काढणेकामीच्या प्रस्तावास ठराव कायम होण्याची वाट न पहाता अमंलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला**.

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे प्रकट केले.

सही/-
सोनाली पोपट जम
अध्यक्षा
ड प्रभाग समिती,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे १७

सही/-
प्रशासन अधिकारी सभा शाखा
ड प्रभाग समिती ,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - १७

जा.क्र.ड/सभा/कावि/११/२०१३
दिनांक ३/९/२०१३
प्रति,
मा.श्री./श्रीमती ----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ड प्रभाग कार्यालय, रहाटणी, १७